पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

व्यवसाय
आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का ?
आपला वेळ, शिक्षण यांचा उपयोग करून नामाकित कंपनीत आपल्याला वेळेत कामाची सुवर्णसंधी!
निश्चित उत्पन्न ■ कोणतीही गुंतवणूक नाही
संपर्क : 8087459854

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २५४ वा | बुधवार, दि. २० मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# अजितदादांच्या मृत्यू प्रकरणात खरातच्या कॉल रेकॉर्डवरुन संशय

## CBI चौकशीची मागणी जोरात

**मुंबई (कटूसत्य वृत्त) :-** अजितदादांच्या मृत्यू प्रकरणात आता नवे आणि धक्कादायक दावे समोर येऊ लागल्याने या प्रकरणाने राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवली आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी अशोक खरात याच्या कॉल रेकॉर्ड आणि मोबाईल वापरासंदभार्तील काही गंभीर बाबी समोर आणत या प्रकरणात नव्या संशयाला तोंड फोडले आहे. त्यानंतर या प्रकरणात राजकीय पडसाद उमटू लागले असून आमदार रोहित पवार यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तातडीने CBI चौकशीची मागणी केली आहे.

अंजली दमानिया यांनी पत्रकारांशी बोलताना दावा केला की, अजितदादांच्या अपघाती मृत्यूपूर्वीच्या सहा दिवसांत अशोक खरातने तब्बल चार मोबाईल फोन बदलले. एवढेच नव्हे, तर एका मोबाईल हँडसेटचा वापर केवळ १९ मिनिटांसाठी करण्यात आला आणि त्यानंतर तो तातडीने बदलण्यात आल्याचेही त्यांनी म्हटले आहे. या प्रकारामुळे अनेक संशय निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

दमानिया यांनी आणखी एक खळबळजनक आरोप करत सांगितले की, ज्या दिवशी अजितदादांचे निधन झाले त्याच दिवशी अशोक खरातने वापरलेला फोन त्यानंतर पुन्हा कधीच वापरण्यात आला नाही. तसेच त्याच्या फोनवर सर्वाधिक कॉल हे अपघाताच्या दिवशीच झाल्याची माहितीही समोर आली असल्याचा दावा त्यांनी केला.

विशेष म्हणजे, एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने ही माहिती समोर आणल्याचे दमानिया यांनी स्पष्ट केले. अशोक खरातच्या पाच वेगवेगळ्या फोनच्या वापराचे विश्लेषण करत त्यांनी या प्रकरणात





सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या मते, या सर्व घटनांची साखळी संशय वाढवणारी असून संबंधितांची चौकशी होणे आवश्यक आहे.

दरम्यान, दमानिया यांच्या आरोपांनंतर अजितदादांच्या न्यायासाठी भूमिका घेणारे आमदार रोहित पवार यांनीही या प्रकरणात सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा अशी मागणी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे त्यांनी या प्रकरणाचा तपास CBI कडे वर्ग करण्याची मागणी केली.

रोहित पवार म्हणाले की, 'अजितदादांच्या अपघात प्रकरणात अनेक धक्कादायक बाबी समोर येत आहेत. या संदर्भात CID कडे माहिती देण्यात आली असतानाही अद्याप ठोस कारवाई होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास CBI कडे देणे अत्यंत गरजेचे आहे.'

तसेच त्यांनी सरकारला इशाराही दिला. 'सरकारने या प्रकरणात अधिक विलंब करू नये. उशीर झाल्यास संशयाचे धुके आणखी गडद होईल आणि संबंधित गुन्हेगारांना पुरावे नष्ट किंवा दडपण्याची संधी मिळू शकते,' असे ते म्हणाले.

दरम्यान, या प्रकरणात समोर आलेले आरोप अत्यंत गंभीर स्वरूपाचे असले तरी संबंधित आरोपांची अधिकृत यंत्रणांकडून अद्याप पुष्टी झालेली नाही. त्यामुळे आता सरकार आणि तपास यंत्रणा या प्रकरणात काय भूमिका घेतात, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. राजकीय वतुर्ळासह सर्वसामान्य नागरिकांमध्येही या घडामोडींविषयी उत्सुकता वाढली आहे.

# विठ्ठल मंदिरात भाजप कार्यकर्त्यांचा गोंधळ

## व्हीआयपी दर्शनासाठी गेटवर धक्काबुक्की

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सध्या सुरू असलेल्या मे महिन्याच्या सुट्ट्या आणि देशभरातून रोज येत असलेले हजारोंच्या संख्येने पर्यटक यामुळे पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र आहे. असे असताना पंढरपूर मध्ये भाजप कार्यकर्त्यांनी मंदिरासमोर व्हीआयपी दर्शनासाठी गोंधळ घातल्याचे किळसवाण चित्र पाहायला मिळाले य . भाजप युवा मोचार्चे प्रदेशाध्यक्ष कृष्णाराज महाडिक यांच्या पंढरपूर दौऱ्या वेळी विठ्ठल मंदिराच्या बाहेर मोठा गोंधळ झाला.



भाजप कार्यकर्त्यांनी विठ्ठलाचे थेट आणि व्हीआयपी दर्शन मिळावे, यासाठी मंदिराच्या व्हीआयपी गेटवर धक्काबुक्की, ढकलाढकली आणि गोंधळ केलेला दिसून आला.

दरम्यान, भाजपा युवा मोचार्चे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक हे पंढरपुरात आले होते. त्यांच्यासोबत शेकडो कार्यकर्तेही होते. त्यावेळी कृष्णराज महाडिक आणि त्यांच्या सोबत मोजक्या तीन ते चार लोकांना विठ्ठल मंदिरात व्हीआयपी गेटवरून प्रवेश देण्यात आला. मात्र कृष्णराज महाडिक यांच्यासोबत दर्शन घेण्यासाठी भाजप कार्यकर्त्यांनी मात्र व्हीआयपी गेटवर मोठी गर्दी करून मंदिरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. यावेळी काहीसा गोंधळ उडाल्याचे चित्र बघायला मिळालं आहे. मात्र असे असताना सर्वसामान्यांना लांबचलांब रांगेत उभे राहावं लागत असताना दुसरीकडे राजकीय मंडळींना मिळणाऱ्या सोयींमुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

दरम्यान, रविवारपासून सुरू झालेल्या पुरुषोत्तम अर्थात अधिक मासानिमित्त पहिल्याच दिवशी पंढरपुरात भाविकांची विक्रमी गर्दी झाली असून जवळपास चार लाखापेक्षा जास्त भाविकांमुळे पंढरपूर ओवर पॅक झाल आहे. रविवारपासून एक महिनाभर पुरुषोत्तम अर्थात अधिकमास सुरू राहणार असून आता रोज अशाच पद्धतीने देशभरातील भाविकांची गर्दी पंढरपुरात असणार आहे. आज विठ्ठल दर्शनासाठी 5 तासाचा कालावधी लागत असून मंदिर प्रशासनाने दर्शन रांगेचे योग्य नियोजन केले आहे.

# विजयरावांच्या आग्रहखातिर उड्डाण पुल केलं मंजूर

## आ. विजयकुमार देशमुखांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे सोलापूरच्या उड्डाण पुलासाठी अभिवचन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहराच्या वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाय मानल्या जाणाऱ्या जुना पुणा नाका ते बोरामणी नाका उड्डाण पुलाच्या रखडलेल्या कामाबाबत केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी अत्यंत भावनिक आणि स्पष्ट शब्दांत भूमिका मांडत हे काम लवकरच मार्गी लावणार असल्याची ग्वाही दिली. सोलापूर दौऱ्यादरम्यान आयोजित कार्यक्रमात बोलताना विजयराव यांच्या आग्रहखातिर उड्डाण पुल केल मंजूर. माजी पालकमंत्री तथा विद्यमान आमदार विजयकुमार देशमुख यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे विशेष कौतुक करत, 'विजयरावांनी या प्रकल्पासाठी खूप संघर्ष केला आहे. त्यांना दिलेला शब्द मी नक्की पाळणार,' असे ठाम विधान केले.

गडकरी म्हणाले की, सोलापूर शहराच्या विकासासाठी केंद्र सरकार कटिबद्ध असून शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी अनेक मोठे प्रकल्प



राबविण्यात येत आहेत. मात्र, उड्डाण पुलाच्या कामात जमीन संपादन आणि अंतिम प्रशासकीय मंजुरीच्या प्रक्रियेमुळे अडथळे निर्माण झाले. महाराष्ट्र शासनाने आवश्यक जमीन मंजूर केली असली तरी त्याला अद्याप अंतिम क्लिअरन्स मिळालेली नसल्याने प्रकल्प रखडल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी गडकरी यांनी प्रामाणिकपणे कबुली देताना सांगितले की, 'या प्रकल्पात कुणाचाही दोष नाही. पण त्यावेळी लँड ॲक्विझिशनची प्रक्रिया शासन खात्यात योग्य पद्धतीने पूर्ण झाली असती, तर हे काम आतापर्यंत पूर्ण झाले असते. ही



माझी चूक मानतो.' त्यांच्या या वक्तव्याने उपस्थितांमध्ये एकच चर्चा रंगली.

तसेच तत्कालीन मुख्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक प्रवीण परदेशी यांनी नगरोथान योजनेअंतर्गत विशेष निधी निर्माण करून या उड्डाण पुलासाठी आर्थिक तरतूद करण्याचे आश्वासन दिले होते, अशी माहितीही गडकरी यांनी दिली. 'आता हा प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत पूर्ण होणार असून, सोलापूरकरांना वाहतूक कोंडीतून मोठा दिलासा मिळेल,' असे ते म्हणाले.

### सोलापूरसाठी एक लाख कोटींची विकासकामे

सोलापूर जिल्ह्यासाठी जाहीर करण्यात आलेली तब्बल एक लाख कोटी रुपयांची विकासकामे पुढील पाच वर्षांच्या आत पूर्ण करण्याचा निर्धारही गडकरी यांनी व्यक्त केला. रस्ते, उड्डाण पूल, सेवा रस्ते, भुयारी मार्ग आणि राष्ट्रीय महामार्गांच्या माध्यमातून सोलापूरला राज्यातील महत्त्वाचे लॉजिस्टिक आणि औद्योगिक केंद्र बनविण्याचा सरकारचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

अहमदनगर-सोलापूर चौपदरीकरणासाठी ११०० कोटी

अहमदनगर-सोलापूर-करमाळा-टेंभुर्णी या महत्त्वाच्या मार्गाच्या चौपदरीकरणासाठी तब्बल ११०० कोटी रुपयांची निविदा निश्चित झाल्याची माहिती गडकरी यांनी दिली. हा मार्ग पूर्ण झाल्यानंतर पुणे, नगर आणि मराठवाड्याकडून सोलापूरकडे होणारी वाहतूक अधिक वेगवान आणि सुरक्षित होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उड्डाण पुलाच्या खर्चात मोठी वाढ, जुना पुणा नाका ते बोरामणी नाका उड्डाण पुलासाठी सुरुवातीला सुमारे ५०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र, कालांतराने बांधकाम साहित्याचे वाढलेले दर, तांत्रिक बदल आणि प्रशासकीय विलंब यामुळे आता या प्रकल्पाचा खर्च तब्बल १००० कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचे गडकरी यांनी सांगितले. 'निधी वाढल्याचे दुःख आहे, पण विकासकामे थांबविणार नाही,' असेही त्यांनी स्पष्ट केले.

# आपत्तीच्या काळात सर्व यंत्रणांनी 'दामिनी' व 'सचेत' मोबाईल ॲपचा प्रभावी वापर करावा - अप्पर जिल्हाधिकारी निन्हाळी

**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात मान्सून कालावधीत उद्भवू शकणाऱ्या संभाव्य आपत्तींच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाची तयारी सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी करावी आपत्ती व्यवस्थापनाचे आराखडे तयार करावेत. विविध विभागांचा समन्वय चांगला असावा. तसेच आपत्तीच्या प्रसंगी सर्व यंत्रणांनी 'दामिनी' मोबाईल ॲप व 'सचेत' मोबाईल ॲपचा प्रभावी वापर करावा, असे निर्देश अप्पर जिल्हाधिकारी गणेश निन्हाळी यांनी दिले.

मान्सन पूर्व तयारी 2026 च्या अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत सर्व शासकीय यंत्रणांची अप्पर जिल्हाधिकारी गणेश निन्हाळी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी ते मार्गदर्शन



करत होते. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिशागर ढोले, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता श्रीमती अकुललवार यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी तर सर्व तहसिलदार व्ही.सी.द्वारे उपस्थित होते.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी श्री. निन्हाळी म्हणाले की, परिवहन विभागाने जेसीबी, पॉकलेन यांसारख्या अर्थमूव्हिंग इक्विपमेंटची माहिती तयार ठेवावी. तसेच तहसिलदारांनी तालुकास्तरावरील सर्व यंत्रणांच्या बैठका घेऊन आपत्तीपूर्व तयारी पूर्ण करावी. संभाव्य आपत्तीच्या अनुषंगाने सर्व शासकीय विभागांनी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करून त्यांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

ग्रामसुरक्षा यंत्रणा ही एक प्रभावी व युनिक व्यवस्था असून आपत्ती पूर्वसूचना देण्यासाठी तिचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.

महावितरण विभागाने २४ तास सुरू राहील असा नियंत्रण कक्ष स्थापन करावा तसेच वादळ व अतिवृष्टीमुळे वीज तारा तुटून वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश श्री. निन्हाळी यांनी दिले.

जनावरांच्या चाऱ्याबाबत तहसिलदारांनी आढावा घेऊन टंचाई टाळण्यासाठी योग्य नियोजन करावे. आवश्यकतेनुसार चाराबंदी आदेश जारी करण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच प्रत्येक तहसिलदारांकडे आपत्तीच्या काळात थेट समन्वयासाठी गोपनीय फोन उपलब्ध असावा, जीवनावश्यक वस्तूंचा पुरेसा साठा ठेवावा, नालेसफाईची कामे पूर्ण करावीत तसेच तलाव व विहिरीतील पाण्याची स्वच्छता राखण्याच्या सूचना ही अपर जिल्हाधिकारी गणेश निन्हाळी यांनी दिल्या.

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने संभाव्य आपत्तीच्या दृष्टीने केलेल्या तयारीची माहिती बैठकीत दिली. तसेच जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय सर्व संबंधित यंत्रणांनी आपापल्या विभागाच्या मार्फत आपत्ती काळात करावयाच्या कामकाजाची तसेच आवश्यक साहित्याची माहिती त्यांनी दिली.

# चार महिन्यांपासून अनियमित पाणीपुरवठा; टँकरवर नागरिकांची भिस्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील जुळे सोलापुरातील रेणुका नगर परिसरात ऐन उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून, नागरिकांना पाणी टँकरद्वारे विकत घेण्याची वेळ आली आहे.

गेल्या चार महिन्यांपासून नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने येथील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.रेणुका नगरमध्ये



सुमारे सहाशे घरांची वसाहत असून, महापालिकेकडून होणारा पाणीपुरवठा अत्यंत अनियमित असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. परिसरात आठ-आठ दिवसांनी कमी दाबाने पाणी येत असल्याने नागरिकांना पुरेशी पाणीसाठवणूकही करता येत नाही. परिणामी अनेक कुटुंबांवर खासगी टँकरने पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे.नागरिकांनी याबाबत महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत. मात्र, अधिकाऱ्यांकडून केवळ औपचारिक उत्तरे मिळत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

उन्हाळ्याच्या तीव्रतेत पाण्यासारख्या मूलभूत समस्येमुळे नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. सामाजिक कार्यकर्ते प्रशांत शिरगुर यांनी सांगितले की, "गेल्या चार महिन्यांपासून रेणुका नगरातील पाणी समस्या गंभीर बनली आहे. पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी आणि झोन अधिकाऱ्यांपर्यंत हा प्रश्न अनेकदा पोहोचवला. मात्र, अद्याप कोणतेही ठोस उपाय करण्यात आलेले नाहीत. महापालिकेच्या गलथान कारभाराचा फटका नागरिकांना सहन करावा लागत आहे."दरम्यान, महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या भागातील पाणीपुरवठ्याकडे तातडीने लक्ष देऊन नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# देवडीत १९९३ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

## जुन्या आठवणींना उजाळा, मैत्रीचा सुवर्ण सोहळा

**मोहोळ (कटूसत्य वृत्त) :** शैक्षणिक सुविधांच्या बाबतीत एकेकाळी मागास मानल्या गेलेल्या देवडी आणि पंचक्रोशी परिसरात ३५ वर्षांपूर्वी शिक्षणाचे रोवलेले बीज आज वटवृक्षासारखे फोफावताना पाहून मन भरून येते, अशी भावना महात्मा गांधी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक शिवाजी तळेकर यांनी व्यक्त केली. देवडी येथील जिल्हा परिषद शाळा व महात्मा गांधी विद्यालयातील इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत (सन १९९३) एकत्र शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांनी सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या स्नेहमेळाव्यात ते बोलत होते.

या आगळ्यावेगळ्या स्नेहमेळाव्याचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दामोदर सोनपावले गुरुजी होते. प्रमुख अतिथी म्हणून बाळासाहेब थोरात गुरुजी, सौदागर चव्हाण गुरुजी, माजी मुख्याध्यापक शिवाजी तळेकर, कुमार थोरात व आप्पासाहेब काकडे सर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी समाजसुधारक आणि स्त्री शिक्षणाच्या जनक सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित गुरुजनांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी शिक्षकांनी जुन्या विद्यार्थ्यांना पाहून समाधान व्यक्त करत, केलेल्या परिश्रमांचे आज सार्थक झाल्याची भावना व्यक्त केली.

स्नेहमेळाव्यादरम्यान शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देताना वातावरण भावनिक झाले. वर्गमैत्रीण आशा आंबेकर यांनी सुरुवातीपासून



शेवटपर्यंत जुन्या आठवणी आणि विनोदी प्रसंग सांगत उपस्थितांना खळखळून हसविले. सुवर्णा वाखरकर यांनी पुढील आयुष्यात योगाचे महत्त्व विशद केले. अनेक माजी विद्यार्थ्यांनी बालपणातील आठवणी, शाळेतील खोड्या, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि मैत्रीचे क्षण आठवत अशाच पद्धतीने पुढेही एकत्र येण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी माजी विद्यार्थी गोविंद थोरात यांनी सादर केलेल्या कवितेने कार्यक्रमाची रंगत आणखी वाढवली. "जुन्या मित्रांना नव्याने पाहू, चल मित्रा गेट टुगेदरला जाऊ..." या ओळींनी जुन्या मैत्रीचा गंध पुन्हा दरवळला. बदललेला काळ, तंत्रज्ञानामुळे पुन्हा जोडली गेलेली नाती आणि वयानुसार आलेले बदल यांचे हलक्या-फुलक्या शैलीत वर्णन करत त्यांनी उपस्थितांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले.

"काळे कुरळे बाल गेले, गुबरे गाल गेले... वाढलेली ढेरी मिरवत एकदा नेऊ, चल मित्रा गेट टुगेदरला जाऊ!" या ओळींवर उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

हा स्नेहमेळावा यशस्वी करण्यासाठी शहाजी थोरात, समाधान थोरात, शहाजी सुरवसे, बहिरीनाथ राऊत यांच्यासह सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका थोरात आणि मोहिनी थोरात यांनी प्रभावी व सुनियोजित पद्धतीने केले.

या मेळाव्यास रेणुका थोरात, आशा आंबेकर, संगीता थोरात, शहाजी सुरवसे, शहाजी थोरात, अशोक बचूटे, अप्पाराव थोरात (मेजर), सत्यवान नरके, पांडुरंग सुरवसे, आबासाहेब जाधव, बंडू मते, सुवर्णा वाखरकर, बहिरीनाथ राऊत, बंडू पासले, विक्रम थोरात, सुनीता भोसले, गोविंद थोरात, सुनील राऊत, परमेश्वर सरक, समाधान थोरात, प्रमोद कुलकर्णी, नागेश थोरात, शोभा तळेकर, शिवाजी शिंदे, मेजर शहाजी चव्हाण, शरद भोसले, जालिंदर गुंड, दत्ता पवार, मोहिनी थोरात, सिद्धेश्वर रोकडे, बापू मुसळे, भारत गुंड, छाया कदम, भास्कर थोरात, अरुण थोरात, सिद्धेश्वर सोलंकर, रोहिदास नागटिळक, धनाजी पाटेकर, सुधाकर पाटेकर, श्रीराम वाघमारे, सतीश जमदाडे आणि सुभाष थोरात यांच्यासह अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते.

स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने जुन्या आठवणी, शिक्षकांचे संस्कार आणि मैत्रीची नाळ पुन्हा एकदा घट्ट झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. जुन्या मित्रांच्या सहवासात हरवलेले बालपण पुन्हा अनुभवण्याची संधी मिळाल्याने उपस्थितांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहताना दिसत होता.

## संपादकीय

# आर्थिक दरी

आज प्रत्येक स्तरावर एकच प्रश्न उभा आहे, उद्याचा भरवसा कोणावर ठेवायचा? नोकरी अनिश्चित, मजुरी अनिश्चित, शेती अनिश्चित आणि बाजारपेठही अनिश्चित.

अशा वेळी कोट्यवधींची संपत्ती असलेले लोकप्रतिनिधी निर्णय घेताना दिसतात आणि सामान्य नागरिक व सत्ताधारी वर्ग यांच्यातील दरी आणखी वाढताना जाणवते.

दुरावत चाललेल्या समाजात आशेचा शोध घेणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. आपल्या आजूबाजूला इतक्या विरोधाभासी गोष्टी एकाच वेळी घडताना दिसतात की समाज नेमका कोणत्या दिशेने चालला आहे, हा प्रश्न सतत पडत असतो.

एका बाजूला विकासाचे दावे, अर्थव्यवस्थेची आकडेवारी आणि आधुनिकतेच्या चमकदार कथा आहेत; तर दुसऱ्या बाजूला रोजच्या जगण्यासाठी झगडणारा सामान्य माणूस, नोकरीची असुरक्षितता, वाढती आर्थिक दरी आणि भविष्याबद्दलची चिंता आहे. हाच विरोधाभास आजच्या काळाचे सर्वात ठळक वास्तव बनत चालला आहे.

अलीकडे पाच राज्यांच्या निवडणुकांनंतर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या आर्थिक स्थितीवर एक विश्लेषण समोर आले. त्यात अनेक धक्कादायक बाबी दिसून आल्या. काही राज्यांमध्ये तब्बल 86 टक्के आमदार कोट्यधीश असल्याचं स्पष्ट झालं.

अनेकांकडे शेकडो कोटी रुपयांची मालमत्ता आहे. संपत्ती असणं चुकीचं नाही. दारिद्र्यांचं गौरवीकरण करण्याचंही काही कारण नाही. परंतु इथे प्रश्न केवळ पैशांचा नाही, तर समाजातील प्रतिनिधित्व आणि वास्तव यांच्यात वाढत चाललेल्या अंतराचा आहे. 2025च्या हुरून इंडिया वेल्थ रिपोर्टकडे पाहिलं, तर चित्र अधिक स्पष्ट होतं. तब्बल आठ कोटी लोकसंख्या असलेल्या तामिळनाडूमध्ये केवळ 72 हजार कोट्यधीश कुटुंबं आहेत.

म्हणजे राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या अत्यल्प टक्केवारीत ही कुटुंबे येतात. पण याच वर्गातील लोक राज्याच्या विधानसभेत प्रचंड प्रमाणात प्रतिनिधित्व करताना दिसतात. केरळमध्येही साधारण तसंच चित्र आहे.

राज्यातील अत्यल्प कोट्यधीश कुटुंबांच्या तुलनेत विधानसभेतील कोट्यधीश आमदारांची संख्या प्रचंड मोठी आहे. आसाममध्ये तर ही दरी आणखी ठळकपणे जाणवते. राज्यातील अत्यल्प संपन्न वर्गातून बहुसंख्य लोकप्रतिनिधी निर्माण होत आहेत. पश्चिम बंगालमध्येही हीच स्थिती आहे.

ही केवळ आकडेवारी नाही, तर लोकशाहीतील वाढत्या दुराव्याचं प्रतिबिंब आहे. रोजीरोटीसाठी संघर्ष करणाऱ्या समाजाचं प्रतिनिधित्व अशा वर्गाकडे जात आहे, ज्यांचं आर्थिक वास्तव सामान्य नागरिकांपेक्षा अनेक पटींनी वेगळं आहे. प्रत्येक निवडणुकीनंतर या कोट्यधीश प्रतिनिधींची संख्या कमी होण्याऐवजी वाढत चालली आहे. त्यामुळे एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो की, सामान्य माणसाच्या वेदना, असुरक्षितता आणि संघर्ष यांची खरी जाणीव या प्रतिनिधींना कितपत असू शकते?

याच काळात दुसरं एक चित्र समोर येतं आणि ते आणखी अस्वस्थ करणारं आहे. देशाचं आयटी केंद्र मानल्या जाणाऱ्या बंगळुरूमध्ये आयटी क्षेत्रातील तरुण कर्मचारी रस्त्यावर उतरलेले दिसतात. 'पगार वाचवा, नोकरी वाचवा' अशा घोषणा देत ते आंदोलन करत आहेत.

काही काळापूर्वी नोएडामध्ये कारखान्यातील कामगारांनी अशाच प्रकारे मजुरीसाठी आवाज उठवला होता. फरक इतकाच की तिथे कामगार होते आणि इथे उच्चशिक्षित आयटी व्यावसायिक आहेत. पण दोघांच्याही चेहऱ्यावरची चिंता एकच आहे 'भविष्याची असुरक्षितता'.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआयमुळे निर्माण झालेली भीती केवळ रोजगार जाण्याची भीती नाही. ती मध्यमवर्गीयांची स्वप्नं तुटण्याची भीती आहे. शिक्षण, मोठे व्हा आणि सुरक्षित आयुष्य जगा या अनेक दशकांपासून रुजलेल्या विश्वासालाच आता तडा जाताना दिसतो आहे. ज्यांना कालपर्यंत स्थैर्याचं प्रतीक मानलं जात होतं, तेच आयटी क्षेत्रातील तरुण आज स्वतःच्या नोकरीसाठी रस्त्यावर उतरले आहेत. ही परिस्थिती केवळ आर्थिक नाही; ती मानसिक आणि सामाजिक असुरक्षिततेचंही चित्र आहे.

आज प्रत्येक स्तरावर एकच प्रश्न उभा आहे, उद्याचा भरवसा कोणावर ठेवायचा? नोकरी अनिश्चित, मजुरी अनिश्चित, शेती अनिश्चित आणि बाजारपेठही अनिश्चित. अशा वेळी कोट्यवधींची संपत्ती असलेले लोकप्रतिनिधी निर्णय घेताना दिसतात आणि सामान्य नागरिक व सत्ताधारी वर्ग यांच्यातील दरी आणखी वाढताना जाणवते. लोकशाहीचं मूलतत्त्व म्हणजे लोकप्रतिनिधी.

म्हणजे अशी व्यक्ती जी समाजाच्या वेदना जाणेल, त्यांची भाषा बोलेल आणि त्यांच्या वास्तवाशी जोडलेला असेल. पण जेव्हा प्रतिनिधी आणि समाज यांच्यात आर्थिक, सामाजिक आणि जीवनानुभवाची प्रचंड दरी निर्माण होते, तेव्हा लोकशाहीचा भावनिक धागाही कमकुवत होऊ लागतो.

या ठिकाणी आजच्या व्यवस्थेची सर्वात मोठी शोकांतिका दिसते. कोट्यवधी रुपये खर्च करून निवडणूक लढवणारा कोट्यधीश नेता आणि रस्त्यावर हातगाडी लावून जगणारा सामान्य माणूस यांच्यातील अंतर केवळ पैशांचं राहत नाही; ते अनुभवांचं, संवेदनांचं आणि वास्तवाचं अंतर बनतं.

नोएडातील कारखान्यात घाम गाळणारा कामगार, रात्री जागून कोड लिहिणारा आयटी कर्मचारी आणि वाढत्या खर्चामुळे हतबल झालेला मध्यमवर्गीय नागरिक यांची चिंता समजून घेण्यासाठी फक्त राजकीय भाषण पुरेसं नसतं; त्यासाठी त्या वास्तवाशी जोड आवश्यक असतं. आज देश पुढे जात असल्याचं चित्र उभं केलं जातं. उंच इमारती, वाढती अर्थव्यवस्था, जागतिक स्तरावरील दावे आणि मोठमोठे प्रकल्प यांची चर्चा सातत्याने होत असते. पण या चमकदार चित्रामागे समाज आतून अधिक तुटत चालल्याची भावना सामान्य माणसाच्या मनात निर्माण होत आहे. विकासाच्या गजराती सामान्य नागरिकाला स्वतःच्या भविष्याबद्दल पूर्वीपेक्षा अधिक असुरक्षित वाटत आहे.

लोकशाही ही समानतेची व्यवस्था मानली जाते. पण आज तीच व्यवस्था अनेकांना दोन वेगळ्या जगांमध्ये विभागली गेल्यासारखी वाटू लागली आहे. एका बाजूला प्रचंड संसाधनं, सत्ता आणि आर्थिक ताकद असलेला वर्ग आहे; तर दुसऱ्या बाजूला रोजच्या आयुष्याची लढाई लढणारा सामान्य समाज. त्यामुळे निर्माण होणारी बैचैनी केवळ गरिबीची नाही; तर स्वतःच अप्रासंगिक ठरण्याची भीती आहे.

कधी कधी असं वाटतं की आपण खूप दूर आलो आहोत. मागे वळण्याचे रस्ते धूसर झाले आहेत आणि पुढे नेमकी कोणती दिशा आहे, याचाही ठाव लागत नाही. अशा काळात समाजाला केवळ आर्थिक विकास नव्हे, तर विश्वास, संवेदनशीलता आणि प्रतिनिधित्व यांचीही नव्याने गरज आहे. कारण आशा तेव्हाच निर्माण होते, जेव्हा सामान्य माणसाला असं वाटतं की व्यवस्था अजूनही त्याची आहे, त्याच्यासाठी आहे आणि त्याचा आवाज अजूनही कुणीतरी ऐकून घेत आहे.

CHANGE IN NAME

I am changing my name from **ANITA SHANKAR MALI** to **RUPALI PRAKASH KHOBARE** for passport issuance.

# पाण्याची बचत : काळाची गरज

राज्यातील तापमानाचा पारा जसा वाढत चालला आहे तसा राज्यातील पाण्याचा साठाही आटत चालला आहे. गेल्या काही दिवसात राज्यात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात शेतीसाठी तर सोडाच पिण्यासाठीही पाणी मिळणे कठीण झाले आहे. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भात दुष्काळाच्या झळा जास्त जाणवत आहे. मराठवाड्यात अनेक मोठ्या प्रकल्पात पाणी साठा संपत आला आहे. राज्यातील धरण साठ्यातही सरासरी तीस ते चाळीस टक्केच पाणी शिल्लक आहे. फेब्रुवारीमध्ये राज्यातील पाणी साठा ६९ टक्के इतका होता तो आज ३३टक्क्यांवर आला आहे. राज्यभरातील धरणामधला सुमारे ३६ टक्के उपयुक्त साठा कमी झाला आहे त्यामुळे राज्यातील काही शहरांत चार ते पाच दिवसांतून एकदा पाणी सुटत आहे. राज्यातील ४११ गावे आणि ११९४ वाड्या – वस्त्या टँकरवर अवलंबून आहेत. शासनाकडून ४६६ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. विशेषतः विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची परिस्थिती चिंताजनक आहे. अनेक गावांमध्ये विहिरी आणि बोअरवेल आटल्या आहेत त्यामुळे या गावात टँकरने पाणी पुरवठा करावा लागत आहे. काही गावात आठ दिवसातून एकदा टँकर येतो तर काही गावात पंधरा दिवसातून एकदा टँकर येतो. पाण्यासाठी दाही दिशा अशी लोकांची अवस्था झाली आहे. पाणी मिळत नसल्याने नागरिक हैराण झाले आहेत. राज्यातील अनेक तालुक्यात पाण्याची पातळी खालावली आहे. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. पाण्यासाठी नागरिकांवर दाही दिशा फिरण्याची वेळ आली आहे. मुकी जनावरे आणि पक्षांना देखील पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्याने आणि स्कायमेटने वर्तवला असल्याने पाण्याचे मोठे संकट उभे राहू शकते. यावर्षी पावसाचे आगमन वेळेत होईल असाअंदाज वर्तवण्यात आला असला तरी यावर्षी पावसाचे प्रमाण कमी राहील असाही अंदाज वर्तवण्यात आल्याने दुष्काळाचे संकट आणखी गडद होण्याची शक्यता आहे. अर्थात हे संकट केवळ पावसाच्या कमतरतेमुळे निर्माण झाले असे नाही तर ती नियोजनातील त्रुटी, भूजलाचा अनियंत्रित उपसा, जलस्त्रोतांचे असमान वितरण आणि पाण्याचा अव्यवस्थित वापर या कारणामुळे देखील हे संकट ओढावले आहे. हे संकट आणखी गडद होऊ द्यायचे नसेल तर आतापासूनच पाण्याचे योग्य नियोजन करायला हवे. उपलब्ध पाण्याचा अंदाज घेऊन त्याच्या वाटपाचे नियोजन केले पाहिजे. पुण्या – मुंबई सारख्या मोठ्या शहरात आजही २४ तास पाणी पुरवठा केला जातो. २४ तास पाण्याची चंगळ असल्याने कदाचित त्यांना पाण्याचे महत्व माहीत नसेल. पुण्या – मुंबई सारख्या शहरातील काही बेजबाबदार घटक पुरेसे पाणी मिळाल्यानंतर पाण्याची नासाडी करताना दिसतात. नळ खुले सोडून पाणी वाया घालवीत असतात. या शहरातील अनेक ठिकाणी पाण्याची नासाडी होताना दिसते. त्यामुळे या भागातही आवश्यक तितकेच पाणी सोडायला हवे. शहरातीलच नव्हे तर राज्यातील सर्वच नागरिकांनी पाणी जपून वापरायला हवे. भविष्यातील पाण्याचे संकट गांभीयार्ने घेऊन पाण्याचा अपव्यय टाळला आणि काटकसरीने वापर केला तर ही वेळ निभावून नेता येईल. पाणी हेच जीवन आहे. थेंब न थेंब पाण्याची बचत केली पाहिजे. पाण्याची बचत करूनच आपण पाण्याची निर्मिती करू शकतो. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करणे ही काळाची गरज आहे.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# जावयाचे वाण – एक खुळचट परंपरा!

सौर वर्ष आणि चांद्र वर्ष यांच्यात दरवर्षी सुमारे ११ दिवसांचा फरक पडतो. हा फरक साचून तीन वर्षात तो एका महिन्याइतका (सुमारे ३३ दिवस) होतो. ऋतू आणि सण यांची सुसंगती राखण्यासाठी हा अतिरिक्त महिना जोडला जातो, ज्याला 'अधिक मास' असे म्हणतात. सौर वर्षात ३६५ दिवस येतात, तर चांद्र वर्षात ३५४ दिवस असतात. त्यामुळे दरवर्षी ११ दिवसांचा फरक पडतो. तीन वर्षांनंतर हा फरक ३३ दिवसांचा होतो, जो अधिक मास किंवा 'धोंड्याचा महिना' बनतो.

धार्मिक परंपरेनुसार अधिक महिना विष्णूचा महिना मानला जातो. जावयाला विष्णूचे रूप मानले जाते. या महिन्यात जावयाला अनारसे, धोंड्याचे वाण दिले जाते. याशिवाय पुरणपोळी, आमरसाचे जेवण खाऊ घातले जाते. काही ठिकाणी सोनं किंवा चांदीच्या भेटवस्तू देण्याची प्रथा आहे. तसेच, लेक सुखी राहावी म्हणून जावयाचा आदर–सन्मान केला जातो. या महिन्यात जावयाला धोंडे म्हणजे पुरण भरून कणकेचे उकडलेले किंवा तळलेले गोड गोळे दिले जातात. हे गोळे गोल किंवा अंडाकृती, अगदी दगडासारखे असतात. त्यामुळे त्यांना 'धोंडे' म्हटले जाते. या पदार्थामुळेच अधिक मासाला 'धोंड्याचा महिना' असेही म्हटले जाते.

या महिन्यात स्वतःच्या जावयाला खुश करण्यासाठी सोन्याचे अलंकार, नवीन महागडे कपडे, दुचाकी किंवा चारचाकी वाहने देण्याची प्रथा वाढताना दिसते.

सध्या अधिक मास सुरू झाल्याने जावयास वाण देण्याची परंपरा सुरू झाली आहे. या अंतर्गत कोल्हापुरात एका सासऱ्याने जावयाला वाण स्वरूपात तब्बल दीड किलो चांदीपासून बनवलेले, सुमारे साडेचार लाख रुपये किमतीचे वाहन भेट दिल्याची चर्चा आहे. सोन्या–चांदीच्या किंमती आभाळाला भिडलेल्या असताना, जर जावयाला वाण देण्याची लाट वाढली, तर अनेक सासऱ्यांना कर्जबाजारी होऊन जावयाचे लाड पुरवावे लागतील.

एखाद्या सुखवस्तू कुटुंबात आपली मुलगी दिली की मुलीच्या वडिलांचा घोर मिटतो, ही भावनिक गरज काळानुरूप अन्यायकारक बनत गेली. सरकारी नोकरी असलेल्या किंवा जमीन–जुमला, शेतीवाडी असलेल्या मुलाच्या आई–वडिलांकडून मुलीच्या वडिलांच्या अपेक्षांचा गैरफायदा घेतला जातो. हुंडा घेणे आणि लग्नानंतरही मानसन्मानाच्या नावाखाली अपेक्षा ठेवणे, ही प्रवृत्ती अजूनही कायम आहे. घरातील छोट्या–मोठ्या कार्यक्रमांत किंवा विवाहसमारंभांत जावयाला प्रथम खुश करण्यासाठी त्याला सोनं आणि चांगले कपडे द्यावे लागतात; अन्यथा जावईबुवा रुसून बसतात, अशी परिस्थिती निर्माण होते.

जावयाचे लाड करता करता काही सासरेबुवा कर्जबाजारी झाल्याचे आपण पाहतो. मुलीचे सुख आणि आनंद यासाठी तिचा बाप आयुष्यभर कमीपणा घेत राहतो. मुलीचा कोणत्याही कारणाने छळ होऊ नये म्हणून तो सर्व तथाकथित रीतीरिवाज पाळत राहतो.

आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना नेहमी दुय्यम स्थान देण्यात आले आहे. खरंतर पती–पत्नीच्या नात्यात स्त्रीच्या त्यागाची, कष्टाची आणि जबाबदारीची पुरेशी दखल घेतली जात नाही. आता मुली सुशिक्षित आणि कमावत्या बनल्या आहेत. अशा काळातही सासरवाडीकडून अपेक्षा बाळगणारे लालची जावई नाहीत असे नाही. परंपरा जपण्याच्या नावाखाली सासऱ्याला लुबाडण्याची संधी साधण्याच्या विचारात अनेक जावई टपलेले असतात. अशा जावयांना महात्मा फुले यांच्या स्त्रियांविषयीच्या सडेतोड विचारांचे डोस पाजण्याची आवश्यकता आहे.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या " सार्वजनिक सत्यधर्म "या पुस्तकात लिहिले आहे —

'स्त्रियांची जात फार अबला असल्यामुळे या लोभी व धाडसी पुरुषांनी मोठी कावेबाजी करून कोणत्याही कामांमध्ये स्त्री जातीची संमती घेतल्याशिवाय एकंदर सर्व पुरुषांनी आपलेच घोडे पुढे दामटले; त्यांस मानवी हक्क समजू देऊ नयेत, या इराद्याने त्यांस विद्या शिकवण्यास प्रतिबंध केला. यामुळे एकंदर सर्व स्त्रियांवर अशा तऱ्हेचा जुलमी प्रसंग येऊन गुदरला.'

स्त्रियांची जात अबला कशी, हे सांगताना महात्मा फुले लिहितात – 'आपणा सर्वांचे ती सतत रात्रंदिवस नऊ महिने उदरी ओझे वागवीत असता, तिजला कोणत्याच लोभी पुरुषासारखे छक्के–पंजे करून धाडसपणा करता येत नाही; यावरून स्त्रियांना अबला असे म्हणतात.'

याचा परिणाम काय झाला, हे सांगताना ते पुढे लिहितात – 'यावरून एकंदर सर्व जगात प्रथम पुरुषाच्या अत्यंत लोभामुळे हेवा, द्वेष, कृत्रिमपणा वगैरे नानाप्रकारचे दुर्गुण उत्पन्न होऊन सर्व प्रकारची पातके उदयास आली.'

अशा प्रकारे महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्रियांच्या अबलेपणाचा फायदा घेऊन पुरुषांनी निर्माण केलेल्या खुळचट परंपरांचा समाचार घेतला आहे. आज स्त्रिया अबला राहिलेल्या नाहीत; त्या सबला बनल्या आहेत. अशा काळात समाजाने 'जावयाचे वाण' यांसारख्या खुळचट कल्पना मोडीत काढल्या पाहिजेत.



– **किशोर जाधव,** सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# अल्पवयीन माता शोध मोहिमेत कार्यरत आशा सेविकांना धमक्या; कारवाईची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** राज्यभर सुरू असलेल्या अल्पवयीन माता शोध व नियंत्रण मोहिमेत कार्यरत असलेल्या आशा वर्कर्स, आरोग्य सेविका आणि इतर कर्मचाऱ्यांना धमक्या दिल्या जात असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणी संबंधित व्यक्तींवर तातडीने गुन्हे दाखल करण्यात यावेत तसेच कर्मचाऱ्यांची नावे गोपनीय ठेवावीत, अशी मागणी लाल बावटा आशा वर्कर्स संघटनेने महापालिका आरोग्य अधिकाऱ्यांकडे केली आहे.

महाराष्ट्र आरोग्य विभागाच्या वतीने राज्यभरात अल्पवयीन मातांच्या घटनांवर नियंत्रण आणण्यासाठी विशेष मोहीम युद्धपातळीवर राबवली जात आहे. या अंतर्गत आशा सेविका व आरोग्य कर्मचारी माहिती संकलनाचे महत्त्वाचे काम करत आहेत. मात्र, गोपनीय ठेवण्याची अट असतानाही काही ठिकाणी संबंधित अल्पवयीन माता आणि त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत माहिती पोहोचत असल्याची बाब समोर आली आहे.



यामुळे अनेक भागांत आशा सेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत आहे. काही प्रकरणांमध्ये अल्पवयीन माता आढळून आल्यानंतर संबंधित व्यक्तींनी आशा वर्कर्सना धमकीचे फोन केल्याची माहिती पुढे आली आहे. शिवीगाळ, मानसिक दबाव आणि दमदाटीचे प्रकारही वाढल्याचा दावा आशा सेविकांनी केला आहे.

या पार्श्वभूमीवर आशा सेविका आणि त्यांच्या प्रतिनिधींनी महापालिका आरोग्य अधिकाऱ्यांची भेट घेऊन महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, तसेच धमक्या देणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली.

**'ही नावे बाहेर कशी जातात?'**

लाल बावटा आशा वर्कर्स संघटनेच्या जिल्हा सचिवा पुष्पा पाटील यांनी या प्रकरणावर गंभीर प्रश्न उपस्थित केला. 'आशा वर्कर्स आणि संबंधित कर्मचारी अल्पवयीन मातांची नोंदणी करून ती माहिती वरिष्ठांकडे देतात. ही माहिती गोपनीय ठेवली जाते. मात्र संबंधित कुटुंबीय आणि आशा वर्कर्सची नावे बाहेर कशी पोहोचतात? त्यामुळे काही आशा सेविकांना नातेवाईकांकडून धमक्या दिल्या जात आहेत,' असा आरोप त्यांनी केला.

आरोग्य विभागाची मोहीम अल्पवयीन मातांच्या घटनांवर नियंत्रणासाठी महत्त्वाची ठरत असली, तरी प्रत्यक्ष काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न आता ऐरणीवर आल्याचे या घटनेतून स्पष्ट होत आहे.

# प्रा. सुनीलकुमार गोरखनाथ पाटील यांची मानद डॉक्टरेट (Ph D) पदवीसाठी निवड

**सातारा (कटूसत्य वृत्त):–** अभियांत्रिकी व तंत्र शिक्षण (Engineering and Technology) क्षेत्रात गेली चार दशके उल्लेखनीय कार्य केल्या बद्दल पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्युट शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुनीलकुमार गोरखनाथ पाटील यांना ऑलिम्पियाड एग्जामिनेशन कौन्सिल तर्फे मानद डॉक्टरेट (Ph D) पदवी साठी निवड करण्यात आली आहे. सदर पदवी अंबोली सावंतवाडी जिल्हा सिंधुदुर्ग येथील दीक्षांत समारंभात गोव्याचे मुख्यमंत्री व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.



शिक्षण क्षेत्रातील त्यांचे दीर्घ कालीन योगदान, तांत्रिक शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेले प्रयत्न तसेच विद्यार्थ्या मध्ये वैधानिक दृष्टी कोण विकसित करण्यासाठी घेतलेले उपक्रम यांचा आमच्या शैक्षणिक आणि सल्लागार समितीने काळजीपूर्वक पुनरावलोकन आणि शिफारस केल्या नंतर एकमताने ठरविण्यात आले की तुमच्या कामगिरी आणि प्रभावामुळे तुम्ही या मानद सन्मानासाठी अत्यंत पात्र आहात त्याचा गौरव म्हणून हा सन्मान देण्यात आला .

प्रा. पाटील यांनी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शिक्षण अधिक परिणामकारक आणि व्यवहारिक करण्यासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. विशेषतः इलेक्ट्रॉनिक्स आणि तांत्रिक प्रशिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे, कौशल्य आधारित शिक्षणाला प्रोचाहन देणे आणि तरुणांना संशोधन व नवं नवीन उपक्रमासाठी प्रेरित करणे या क्षेत्रात त्यांनी महत्त्व पूर्ण कार्य केले आहे

त्यांच्या नेतृत्वाखाली पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट ने अनेक विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली असून अनेक विद्यार्थी विविध औद्योगिक क्षेत्रात यशस्वी रित्या कार्यरत आहेत. त्यांच्या कायार्मुळे विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक कौशल्य आणि आत्मविश्वास वाढीस लागला आहे

ऑलिम्पियाड एग्जामिनेशन कौंसिल कडून प्रदान करण्यात आलेली मानद डॉक्टरेट पदवी ही प्रा. पाटील यांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाची दखल घेणारी प्रतिष्ठित गौरव चिन्ह आहे. या सन्मानामुळे अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रातील त्यांच्या कायार्ला अधिक प्रेरणा मिळेल.

सदर डॉक्टरेट (पदवी Ph D) निवडीचे पत्र ऑलिम्पियाड एग्जामिनेशन कौंसिल विद्यापीठाचे vice - chancellor डॉ .आचार्य जगदीश यानी सातारा येथे संस्थेमध्ये दिले. सदर प्रसंगी तुमच्या सारख्या व्यक्तीशी संबंध असणे हा आमचा सन्मान आहे.तुमच्या या सन्मानाच्या उदार स्वीकृतीबद्दल आम्ही उत्सुक आहोत ऑलिम्पियाड परीक्षा परिषदेशी असलेले तुमचे संबंध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर विद्यार्थी, व्यावसायिक आणि संस्थांना प्रेरणा देत राहतील असे मनोगत व्यक्त केले सदर प्रसंगी संचालिका सौ संगीता पाटील, प्राचार्य सुजित पाटील, कु स्नेहल पाटील, सौ रेवती पाटील, शिक्षक स्टाफ व विद्यार्थी उपस्थित होते.

सदर पदवी दान समारंभ 25 मे 2026 रोजी आयोजित केला आहे.

# कामावर कर्मचाऱ्याचा मृत्यू, कुटुंबाला न्यायासाठी संघर्ष; Dmart च्या विरोधात संताप व्यक्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** कामाच्या ठिकाणी एका कर्मचाऱ्याचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाल्यानंतर त्याच्या कुटुंबाला न्याय आणि योग्य मदत मिळावी, यासाठी संघर्ष करण्याची वेळ आल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. अब्जावधींची उलाढाल करणाऱ्या मोठ्या ऊें३ कंपनीकडून सामाजिक जबाबदारीची अपेक्षा असताना, मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला न्याय देण्याऐवजी प्रकरण अत्यंत हलक्यापद्धतीने मिटवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला असून, यामुळे संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कर्मचारी कामावर असताना अचानक हृदयविकाराच्या धक्क्याने कोसळला आणि त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर कंपनीने पुढाकार घेऊन मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला आधार देणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात तसे घडले नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

मृत कर्मचाऱ्याच्या पश्चात त्याची वृद्ध आई, पत्नी आणि एक लहान मुलगी असा परिवार असून, कुटुंबाचा एकमेव कर्ता पुरुष गेल्यानंतर त्यांच्या समोर मोठे आर्थिक आणि मानसिक संकट उभे राहिले आहे. घराचा आधारच हरवल्याने या कुटुंबाच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या घटनेवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत संबंधितांनी प्रश्न उपस्थित केला की, ऊें३ सारख्या मोठ्या कंपन्यांची कामगारांप्रती सामाजिक आणि नैतिक जबाबदारी नेमकी काय आहे? कोट्यवधींचा व्यवसाय करणाऱ्या ऊें३ कंपन्या कर्मचाऱ्यांच्या श्रमावर उभ्या राहतात, मात्र संकटाच्या काळात त्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबासोबत कितपत उभ्या राहतात, यावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

"कामगार हा केवळ मशीनचा एक भाग नसतो. त्याच्यामागे एक संपूर्ण कुटुंब असते, त्यांच्या भावना असतात, त्यांची स्वप्ने आणि भविष्य असते," अशी भावना व्यक्त करत संबंधितांनी कंपनीने मानवतेच्या दृष्टीकोनातून या प्रकरणाची दखल घ्यावी, अशी मागणी केली आहे.

तसेच मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला योग्य ती आर्थिक भरपाई, मदत आणि न्याय मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे. कामगारांच्या सुरक्षेचे प्रश्न, कामाच्या ठिकाणची जबाबदारी आणि कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्वाचा मुद्दा पुन्हा एकदा या निमित्ताने ऐरणीवर आला आहे.

दरम्यान, या प्रकरणात संबंधित ऊें३ कंपनीची भूमिका काय राहते आणि कुटुंबाला न्याय मिळण्यासाठी प्रशासन किंवा कामगार विभाग पुढे कोणती भूमिका घेतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## वात्रटिका

### तुकड्याचा तुकडा

सांगता येत नाही नेमके
कोणाचे कोणाशी नाते जडेल...
आणि राजकारणात कधी
सांगता येत नाही काय घडेल...
कळते आहे की फाटाफूटीनंतर
आता ताटातूट होणार आहे...
अस्तित्वाच्या लढाईसाठी कोणी
इकडून तिकडे जाणार आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी करमाळा नगरपालिकेकडे जागेची मागणी




**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** शहरातील सकल धनगर समाज व सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांच्या वतीने करमाळा नगरपालिकेकडे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यासाठी नगरपालिकेच्या हद्दीत योग्य जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात नगराध्यक्षांना निवेदन देण्यात आले असून, या मागणीमुळे शहरात सामाजिक व ऐतिहासिक विषयावर चर्चा सुरू झाली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याची उभारणी करमाळा शहरात व्हावी, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून समाजाच्या वतीने सातत्याने होत आहे. विशेष म्हणजे सन २०२५-२६ हे वर्ष राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जन्मवर्ष म्हणून साजरे होत असल्याने, या वर्षातच त्यांच्या स्मारक व पुतळा उभारणीचा निर्णय व्हावा, अशी भावना समाजबांधवांनी व्यक्त केली आहे. निवेदनानुसार, शहरातील गायकवाड चौक परिसरात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारण्याचा मानस समाजातील कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. या ठिकाणी पुतळा उभारण्यासाठी नगरपालिकेने अधिकृतरीत्या जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सामाजिक व ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी तसेच पुढील पिढीसमोर आदर्श ठेवण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

धनगर समाजाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कारकीर्दीत लोककल्याणकारी निर्णय घेतले, धार्मिक स्थळांचे जतन केले आणि समाजहिताचे कार्य केले. त्यामुळे त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून करमाळा शहरात भव्य पुतळा उभारला जावा, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

या निवेदनाकडे नगरपालिकेने सकारात्मक दृष्टीकोनातून पाहून लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली असून, यावर प्रशासन काय भूमिका घेते याकडे आता करमाळा शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीतून विक्रम सिंह पाटील यांचे विशेष प्राविण्यासह यश



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** कोंढार परिसरातील भिमानगर येथील रहिवासी व माजी कृषी सभापती संजय पाटील भिमानगरकर यांचे सुपुत्र विक्रम सिंह संजय पाटील यांनी अमेरिकेतील प्रतिष्ठित New York University मधून 'एम.एस. इन प्रोजेक्ट मॅनेजमेंट' या पदवी अभ्यासक्रमात अ ग्रेडसह विशेष प्राविण्य मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे कुटुंबासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विक्रम सिंह यांचे शालेय शिक्षण इयत्ता आठवी ते दहावीपर्यंत सोलापूर येथे पूर्ण झाले. त्यानंतर त्यांनी कोल्हापूर येथील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून सिव्हिल इंजिनिअरिंगची पदवी संपादन केली. उच्च शिक्षणाची आवड जोपासत त्यांनी पुढे अमेरिकेत शिक्षणासाठी प्रयाण केले.

परदेशात शिक्षण घेत असताना त्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे, तर प्रोजेक्ट मॅनेजमेंटच्या विविध अंगांमध्येही उत्कृष्ट प्रावीण्य मिळवले. मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी हे यश प्राप्त केले आहे.

त्यांच्या या यशाबद्दल कोंढार परिसरातील विविध गावांमधून तसेच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्वत्र शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# अक्कलकोट नगरपरिषदेचा प्रत्येक गुरुवारी 'नो व्हेईकल डे' साठी झाला निर्णय

## नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांचा संयुक्त निर्णय

**अक्कलकोट, (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट नगरपरिषदेच्या वतीने एक चांगला निर्णय आज घेण्यात आला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुरक्षित भविष्याच्या आणि काटकसरीच्या धोरणांचा आवाहनाचा विचार करून येत्या गुरुवारपासून नगराध्यक्ष,नगरसेवक आणि कर्मचारी यांच्यासाठी प्रत्येक गुरुवारी 'नो व्हेयिकल डे ' पाळण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. ही माहिती अक्कलकोटच्या नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे. इंधनाची बचत करणे हा 'नो व्हेयीकल डे ' याचा मुख्य उद्देश असला तरी त्याला अनेक महत्त्वाचे आणि उपयुक्त असे कारणे लागू होतात याचा विचार करून येत्या गुरुवार तारीख 21 मे 2026 पासून अक्कलकोट नगरपालिकेचे नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष, सर्व नगरसेवक मुख्याधिकारी आणि नगरपरिषदेचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी सदर 'नो व्हेईकल डे' चा अंमल लागू होणार असून तो यापुढे प्रत्येक गुरुवारी पाळला जाणार आहे. या निर्णयाचा लाभ जरी मर्यादित क्षेत्रासाठी असला तरी तो दीर्घकालीन असल्याने त्याचे चांगले फायदे येत्या काळात पहावयास मिळणार आहेत. 'नो व्हेईकल डे' चा मुख्य उद्देश हा वायू प्रदूषण कमी होते.एक दिवस वाहनांचा वापर कमी केल्याने पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी होऊन आर्थिक बचत होते, तसेच देशाच्या इंधन साठ्यावर ताण कमी होतो,वाहतूक कोंडी कमी होते.या सर्व कारणासाठी उपयुक्त ठरावा यासाठी अमलात आणण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाचे सकारात्मक पालन करून एक जागरूक नागरिक म्हणून खारीचा वाटा उचलण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

> अक्कलकोट नगरपरिषदेने घेतलेला 'नो व्हेयिकल डे 'हा दूरगामी परिणाम करणारा महत्त्वाचा निर्णय असून हा केवळ एक दिवस पाळले जाणे यासाठी नसून स्वच्छ पर्यावरण, चांगले आरोग्य आणि सुरक्षित भविष्यासाठी महत्त्वाची सामाजिक चळवळ आहे.शहरवासियांनी दर गुरुवारी या मोहिमेत आपल्या उज्वल भविष्यासाठी शक्य त्यांनी या अडचणीच्या काळात सहभागी होऊन सहकार्य करावे हे आवाहन वजा विनंती आहे.
>
> **- मिलन कल्याण शेट्टी,** नगराध्यक्ष, अक्कलकोट

# विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक व कर्मचाऱ्यांचे 'एनपीएस/डिसीपीएस'चे कोट्यवधी रुपये रखडले



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील सर्व अनुदानित महाविद्यालय व विद्यापीठ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय पेन्शन योजना (NPS) आणि परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) पैसे मागील ऑगस्ट 2025 पासून त्यांच्या खात्यावर जमा झाले नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, त्यांच्यात तीव्र संतापाचे आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या संदर्भात 'सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियन'च्या वतीने उच्च शिक्षण सोलापूर विभागाचे सहसंचालक डॉ. अजयकुमार जाधव यांना एक निवेदन सादर करून तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी कॉलेज कर्मचारी युनियनचे माजी सरचिटणीस अजितकुमार संगवे, सरचिटणीस राजेंद्र गिड्डे, उपाध्यक्ष आनंद व्हटकर, महेश सुरवसे आदी उपस्थित होते.

१ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या दरमहा वेतनातून कर्मचारी हिस्सा १०% आणि शासन हिस्सा १४% अशी एकूण २४% रक्कम कपात केली जाते. मात्र, मागील ९ महिन्यांपासून ही रक्कम कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक 'प्रान' (PRAN) खात्यावर जमा झालेली नाही. NSDL-NPS Trust च्या वेबसाईटवर तपासणी केली असता, तिथे "Not Credited" असा शेरा दिसत आहे. वेळेत पैसे जमा न झाल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतन निधीमध्ये खंड पडत असून, त्यांना मिळणाऱ्या व्याजाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भविष्याची एकमेव पुंजी असलेल्या या निधीबाबत वरिष्ठ पातळीवर कार्यालयात होत असलेल्या या अक्षम्य विलंबाबद्दल कर्मचाऱ्यांमध्ये कमालीची भीती पसरली आहे.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून कर्मचारी संघटनेने प्रशासनाकडे काही प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. यामध्ये ऑगस्ट २०२५ ते आजतागायत या कालावधीतील सर्व थकीत NPS Contribution ची रक्कम व्याजासह कर्मचाऱ्यांच्या PRAN खात्यावर तातडीने वर्ग करण्यात यावी, तसेच तांत्रिक अडचणी दूर करून, यापुढे दरमहा कपात झालेली रक्कम त्याच महिन्याच्या १० तारखेपर्यंत खात्यात जमा होईल अशी ठोस व कायमस्वरूपी व्यवस्था करावी आणि या थकीत कालावधीचे विलंब शुल्क व व्याज कर्मचाऱ्यांना देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

DCPS आणि NPS ही कर्मचाऱ्यांच्या भविष्य निवार्हाची एकमेव योजना असल्याने, शासनाकडून वेळेत रक्कम जमा न झाल्यास कर्मचाऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान होते, असे या पत्रात नमूद करण्यात आले आहे. संघटनेने प्रशासनाला या गंभीर समस्येची तात्काळ दखल घेण्यासाठी ३० दिवसांचा अवधी दिला असून, या मुदतीत संबंधित ट्रेझरी अधिकारी, NPS सेल व वित्त विभागाला आदेश द्यावेत, अशी विनंती केली आहे. हे पत्रक युनियनच्यावतीने सादर करण्यात आले असून, आता यावर प्रशासन काय पावले उचलणार, याकडे सर्व कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### तांत्रिक त्रुटी शोधण्याचे काम सुरू

ही रक्कम ऑनलाईन भरण्यासाठी चलन जनरेट होत नाही. त्यामुळे ही रक्कम जमा करण्यास तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. याबाबत आमच्या कार्यालयाकडून प्रत्येक महिन्यात htesevaarth2@gmail.com यावर मेल करण्यात आला आहे. तसेच याच्या हेल्पलाइन नंबरवरही (०२२६१३१६४२६) प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे या संदर्भात या कार्यालयाने दोन डिसेंबर २०२५ रोजी शिक्षण संचालक उच्च शिक्षण यांना लेखी कळविले आहे. तरीही तांत्रिक त्रुटी शोधण्याचे काम सुरू असून लवकरच यावर तोडगा निघेल, असे विभागीय सहसंचालक डॉ. अजयकुमार जाधव यांनी सांगितले.

# जिल्हास्तरावर कार्यरत जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हयात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ व सुधारित नियम १९९५ अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती कार्यरत आहे. समितीचे मुख्य कार्य अनुसूचित जाती व जमाती समाजावरील अत्याचार प्रकरणांचा आढावा घेणे, गुन्ह्यांच्या तपास व न्यायालयीन प्रक्रियेवर देखरेख ठेवणे, पीडितांना शासनाकडून देण्यात येणारे अर्थसहाय व पुनर्वसन योजनेची अंमलबजावणीचा आढावा घेणे तसेच अत्याचार प्रतिबंधासाठी आवश्यक उपाययोजना सुचविणे होय, जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीमध्ये जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी हे अध्यक्ष असून सहायक आयुक्त समाज कल्याण हे सदस्य सचिव तर पोलिस अधिक्षक, पोलिस आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.

प. प्रकल्प अधिकारी, आदिवासी विभाग, जिल्हा सरकारी अभियोक्ता हे सदस्य असतात, तसेच सदर समितीवर शासन निर्णय क्रमांक जिदनिस १०९५/प्र.क्र. १२३/मावक-२/मुंबई दि.०७ डिसेंबर 1995 अन्वये मा. पालकमंत्री यांच्या मान्यतेने अशासकीय संस्थामधील अनुसूचित जाती, जमातीचे ५ व बिगर मागासवर्गीय समाजातून ३ अशासकीय सदस्य यांची नियुक्ती करणेबाबत निर्देशित आहे. त्यानुसार मा. पालकमंत्री यांचे मान्यतेने अशासकीय संस्थामधील अनुसूचित जाती व जमातीचे ५ व बिगर मागासवर्गीय समाजातून २ अशा एकूण सात अशासकीय सदस्यांची मा. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती सोलापूर यांनी नियुक्ती केलेली आहे.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीमध्ये सर्व नवनियुक्त अशासकीय सदस्यांनी सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन श्रीम. सुलोचना सोनवणे, सदस्य सचिव जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती तथा सहायक आयुक्त समाज कल्याण यांनी केले आहे.

अशी माहिती सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सोलापूर यांनी दिली आहे.

# जिल्हा प्रशासनाचा पर्यावरणपूरक उपक्रम, दर मंगळवारी 'नो व्हेईकल डे'

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इंधन बचत, पर्यावरण संरक्षण आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी आता सोलापूर जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व विभागांमध्ये दर मंगळवारी 'नो व्हेईकल डे' साजरा करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत व पर्यावरण संरक्षणासाठी दिलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून यापूर्वी सोलापूर महानगरपालिका आणि जिल्हा परिषदेकडून 'नो व्हेईकल डे' उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमाला मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादानंतर आता जिल्हा प्रशासनानेही यात सहभाग घेतला आहे.

आज मनपा आणि जिल्हा परिषदेतील अधिकारी तसेच पदाधिकाऱ्यांनी विविध पयार्यी प्रवास साधनांचा वापर करत एक वेगळाच आदर्श घालून दिला. काहींनी सायकल, काहींनी सार्वजनिक वाहतूक तर काहींनी पायी प्रवास करत या मोहिमेत सहभाग नोंदवला.

अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे 'नो व्हेईकल डे' हा केवळ औपचारिक उपक्रम न राहता प्रत्यक्ष कृतीतून दिलेला पर्यावरणपूरक संदेश ठरला आहे. जिल्हा प्रशासनाच्या या निर्णयामुळे इंधन बचत, प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृतीला चालना मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# चंद्रभागा घाटावर महिलांसाठी चेंजिंग रूमची मागणी

## दोन दिवसांत व्यवस्था न झाल्यास आंदोलनाचा इशारा



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** अधिक मासाच्या पार्श्वभूमीवर तिर्थक्षेत्र पंढरपूरमध्ये भाविकांची प्रचंड गर्दी होत असून, दररोज लाखो भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी येत आहेत. या भाविकांमध्ये महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात असतानाही चंद्रभागा नदी पात्रात स्नानानंतर कपडे बदलण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने महिला भाविकांची मोठी गैरसोय होत असल्याचा गंभीर मुद्दा समोर आला आहे. या पार्श्वभूमीवर पंढरपूर शहर युवक काँग्रेसने प्रशासनाकडे तातडीची मागणी करत दोन दिवसांत उपाययोजना न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

पुरुषोत्तम मास अर्थात अधिक मासाला धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व असल्यामुळे पंढरपूरात सध्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. परंपरेनुसार श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनापूर्वी चंद्रभागा नदीत स्नान करण्याला अत्यंत पवित्र मानले जाते. त्यामुळे रोज अंदाजे तीन ते चार लाख भाविक चंद्रभागा नदीत स्नानासाठी येत आहेत. मात्र, स्नानानंतर महिला भाविकांना कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र आणि सुरक्षित जागा नसल्याने त्यांना उघड्यावर किंवा अत्यंत असुविधाजनक परिस्थितीत कपडे बदलण्याची वेळ येत असल्याचे चित्र दिसत आहे.

महिलांच्या सुरक्षेचा आणि सन्मानाचा मुद्दा उपस्थित करत युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष संदिप शिंदे यांनी चंद्रभागा नदी परिसरात तातडीने किमान १० ते १५ चेंजिंग रूम उभारण्याची मागणी केली आहे. याबाबत त्यांनी पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे.

संदिप शिंदे यांनी प्रशासनावर थेट प्रश्नचिन्ह उपस्थित करत सांगितले की, लाखो भाविक पंढरपूरात येत असताना महिलांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. धार्मिक पर्यटनाचा आणि भाविकांच्या सुविधांचा सातत्याने उल्लेख केला जातो; मात्र प्रत्यक्षात महिलांसारख्या संवेदनशील घटकांच्या गरजांकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसत आहे. महिलांना सुरक्षित आणि सन्मानजनक सुविधा मिळणे हा त्यांचा अधिकार असून प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक किरण घाडगे, युवक काँग्रेस उपाध्यक्ष संग्राम मुळे, युवक काँग्रेस उपाध्यक्ष रवी अग्रवाल, अण्णासो पवार, राजेश सुरवसे, अक्षय वनसाळे, प्रशांत कुलकर्णी, अनिल माने यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

युवक काँग्रेसकडून प्रशासनाला दोन दिवसांची मुदत देण्यात आली असून या कालावधीत महिलांसाठी चेंजिंग रूमची उभारणी न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

महिलांच्या सुरक्षेच्या आणि मूलभूत सुविधांच्या प्रश्नावर प्रशासन नेमकी किती तत्परता दाखवते, याकडे आता भाविकांसह सर्वांचे लक्ष लागले आहे. धार्मिक नगरीतील व्यवस्थापन केवळ दर्शनापुरते मर्यादित न राहता भाविकांच्या सन्मान आणि सोयींच्याही दृष्टीने सक्षम असणे आवश्यक असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## चौकशीची जाहीर नोटीस

### सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर

एस. आर. एन. क्रमांक: SLP/००८४९/१८/२६
फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक. ४७८/२०२६

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री हनुमान चॅरिटेबल ट्रस्ट एखतपूर बाबत । न्यासाचा पत्ता :- ३३०, एखतापूर, सांगोला, सोलापूर, सांगोले, एखातापूर
अर्जदार मधुकर तातोबा जाधव, } **अर्जदार**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:- (१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | Corpus Fund | १००१.०० |

(अ) जंगम मिळकत : रोख रु. १००१/- मात्र (अक्षरी रुपये एक हजार एक मात्र फक्त)

स्थावर मिळकत(वर्णन):-

| शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| N0 | N0 | N0 | N0 | N0 | 0.00 |

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक १८-०५-२०२६ रोजी दिली ।

(कोर्टाचा शिक्का)

**अधिक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,सोलापूर**


# Classified - छोटी जाहीरात

## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

## वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) देशाचे संरक्षणमंत्री २) देशाचे रस्ते वाहतूक व बांधकाम मंत्री- नितीन **** ३) भीती (हिंदीत) ४) मच्छीमारी करून उदरनिर्वाह करणारा वर्ग ५) नदीवर बांधलेला साकव, ब्रीज ६) पुष्कळ, भरमसाठ ७) सावकाश मंद गतीने चालणारा एक छोटा प्राणीजीव ९) श्रवणेंद्रिय ११) एक माजी मंत्री-***** पाचपुते १६) दुसऱ्याच्या मनातील ओळखणारा १७) भारताचा माजी कर्णधार व सध्या बीसीसीआय अध्यक्ष - सौरभ *** २०) ब्रेड, केक इत्यादी पदार्थ जेथे बनविले जातात ती जागा २२) शर्ट (ग्रामीण भाषेत) २३) पाकचे माजी पंतप्रधान २७) स्त्रियांचा नाकात घालण्याचा दागिना २९) दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री-** दीक्षित ३०) लष्करातील सैनिकाला शौर्याबद्दल दिले जाणारे मेडल- ***** चक्र ३१) वाळवंट प्रदेश असलेले भारतातील राज्य ३२) लायब्ररी (मराठीत) ३३) चार गुणिले चार ३६) सातारा जिल्ह्यातील फुलांसाठी जगप्रसिध्द असलेले पठार ३९) जरचा साथीदार ४१) कौशल्य ४३) एखाद्या गोष्टीचा घेतलेला ध्यास ४४) ख्रिश्चन धर्मसेविका ४५) टिकून राहणे, गत उलट लिहा

**आडवे शब्द :** १) खा. सुनील तटकरे यांचा लोकसभा मतदारसंघ ४) जोतिबा, अंबाबाई देवस्थान पश्चिम महाराष्ट्रातील या जिल्ह्यात आहे ७) या राज्याची राजधानी पणजी आहे ८) सिंहाचे जोराचे ओरडणे १०) धांदल, घाई १२) अनिल कपूर अभिनीत एक राजकारणावर आधारित चित्रपट १३) उन्हाळ्यातील एक महिना १४) दुप्पट (इंग्रजीत) १५) कागदाचे वीस दस्त्यांचे माप, सायकलचे चाक १६/अ) श्रीगणेशाचा एक मंत्र-* गं गणपतये नम: १८) मोठा ढोल १९) दमयंती पती २०) बिहारमधील मंत्री गिरीराजसिंह यांचा लोकसभा मतदारसंघ २१) विनाकारण, नाहक २३) बनावट २८) विठ्ठल भक्तांचे पंढरीला पायी जाणे ३०) मार्ग, रस्ता ३१) राजाचे भव्य निवासस्थान ३३) सुशीलकुमार शिंदे यांचा लोकसभा मतदारसंघ ३४) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा ** ३५) याचे कणीस भाजून खातात ३७) श्वसनेंद्रिय ३८) चालरूढ, पध्दत ४०) सात गुणिले तीन ४२) आश्चर्य ४४) तिरस्कार (हिंदीत) ४६) शिक्षकांना या नावाने संबोधतात ४७) पोलीस दलाच्या वाहनांच्या येण्याची सूचना करण्यासाठी मोठा आवाज करणारे लावतात ते ४८) श्रीमंतच्या विरूध्दार्थी शब्द ४९) मोफत (इंग्रजीत)

## सुडोकु - 254

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | | | | 2 | 7 | 3 | |
| 7 | | | 1 | 8 | | | 4 | 9 |
| | 8 | | 3 | | 4 | 6 | 5 | |
| | | 3 | | 4 | 9 | | | |
| | | 7 | | | 1 | 8 | 9 | 4 |
| | | | 8 | 2 | | | 6 | |
| 3 | | 9 | | | 8 | 4 | | |
| 1 | | 5 | 4 | | 6 | | 8 | 2 |
| | 4 | | 7 | 5 | | | | |

# नगरसेवक अमोल शिंदे यांच्या सतर्कतेने भंगार चोरीचा प्रकार उघड



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महापालिकेच्या मागील गेटजवळील स्टोअर रूम परिसरातून भंगार साहित्य चोरीचा प्रयत्न उघडकीस आला असून, शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक अमोल शिंदे यांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार समोर आला. या प्रकरणी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह आठ जणांविरोधात सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महापालिकेच्या स्टोअर रूममध्ये अतिक्रमण मोहिमेदरम्यान जप्त केलेले साहित्य ठेवण्यात आले होते. हे साहित्य परवानगीशिवाय खासगी वाहनातून बाहेर नेले जात असल्याची माहिती नगरसेवक अमोल शिंदे यांना मिळाली. त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत संशयित छोटा हत्ती वाहनाची पाहणी केली.

या वेळी स्टोअरमधील भंगार साहित्य खासगी वाहनातून बाहेर नेले जात असल्याचे निदर्शनास आले. प्रकार उघड होताच संबंधित चारजण आणि काही कर्मचारी घटनास्थळावरून पळून गेल्याचे सांगण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच सभागृह नेते नरेंद्र काळे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता सारिका आकुलवार यांना घटनास्थळी बोलावून घेण्यात आले. यावेळी नगरसेवक सत्यजित वाघमोडे, सात्त्विक बडवे, विनायक विटकर, किरण पवार, उपअभियंता अविनाश वाघमारे यांच्यासह अनेक पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

या प्रकरणी जमीर हैदर इनामदार, अनोळखी तीन इसम, अधिकारी जगन्नाथ बनसोडे, सचिन गाडे, दीपक कुंभार आणि देखरेख करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी संगनमत करून परवानगीशिवाय स्टोअर रूममधील साहित्य बाहेर नेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे.

घटनास्थळी सदर बझार पोलिसांचे पथकही दाखल झाले होते. यावेळी नगरसेवक अमोल शिंदे आणि सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी संताप व्यक्त करत संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी केली.

"महापालिकेच्या स्टोअरमधील भंगार खासगी वाहनातून बाहेर नेले जात होते. आम्ही घटनास्थळी पोहोचताच संबंधित काहीजण आणि कर्मचारी पळून गेले. परवानगी नसताना अशा पद्धतीने महापालिकेचे साहित्य चोरीला जाणे ही अत्यंत लाजिरवाणी बाब असून, संबंधितांवर तात्काळ कठोर कारवाई झाली पाहिजे," असे नगरसेवक अमोल शिंदे यांनी सांगितले.

# ‘मी महाराष्ट्र सोडून जाऊ का?’ - शेतकरी आत्महत्या आणि पाणीटंचाईवर नाना पाटेकर भावुक



**नागपूर (कटूसत्य वृत्त):-** विदर्भातील भीषण पाणीटंचाई, दुर्गम भागातील हालअपेष्टा आणि शेतकऱ्यांच्या सातत्याने होणाऱ्या आत्महत्यांच्या घटनांमुळे मन हेलावून जात असल्याची भावना व्यक्त करत प्रसिद्ध अभिनेते व 'नाम फाउंडेशन'चे अध्यक्ष नाना पाटेकर भावुक झाले. ‘हे सगळं थांबवण्यासाठी मी आता महाराष्ट्र सोडून निघून जाऊ का?’ असा भावनिक सवाल त्यांनी उपस्थित केला. यावेळी त्यांनी मतभेद विसरून जलसंधारणाच्या चळवळीत एकत्र सहभागी होण्याचे आवाहन केले.

पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेच्या रौप्य महोत्सवानिमित्त सोमवारी नागपूर येथील रेशीमबागमधील कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित जलक्रांती परिषदेत ते बोलत होते.

या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, महापौर नीता ठाकरे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, ॲड. आशिष जयस्वाल आणि खासदार माया इवनाते यांची प्रमुख उपस्थिती होती.

**केवळ भाषणबाजी नको, कृतीची गरज**

यावेळी बोलताना नाना पाटेकर यांनी शहरातील कृत्रिम जीवनशैलीवरही भाष्य केले. ‘मला शहरात राहणे असह्य होते. तिथल्या सिमेंटच्या भिंती कबरीसारख्या वाटतात,’ असे ते म्हणाले. निसगार्ने दिलेल्या मोफत श्वासाचे महत्त्व ओळखून आता गावागावांत फिरत प्रत्यक्ष काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

‘आम्ही कोणत्याही राजकीय पक्षाचे नाही. सामाजिक प्रश्न सोडवताना आपण सर्वप्रथम नागरिक आहोत,’ असे स्पष्ट करत त्यांनी समाजहितासाठी केवळ भाषण न करता कृती करण्याचे आवाहन केले.

जलसंधारण आणि ग्रामीण विकासासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज अधोरेखित करत नाना पाटेकर यांच्या भावनिक वक्तव्याने उपस्थितांनाही विचार करायला भाग पाडले.

# सोलापूर जिल्ह्यात २० मे रोजी औषध दुकाने बंद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा केमिस्ट व ड्रगिस्ट संघटना यांच्या वतीने दिनांक २० मे २०२६ रोजी जिल्ह्यातील औषध दुकाने बंद ठेवून ऑल इंडिया ऑर्गनायजेशन ऑफ केमिस्ट अँड ड्रगिस्ट यांनी पुकारलेल्या एक दिवसीय बंदमध्ये सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

सदर बंदच्या कालावधीत जिल्ह्यातील रुग्णांना अत्यावश्यक व तात्काळ उपचारासाठी औषधे उपलब्ध व्हावीत तसेच औषधाअभावी कोणत्याही रुग्णाच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये, यासाठी अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्या सोलापूर कार्यालयामार्फत एक दिवसीय नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला आहे.

औषध उपलब्धतेसंदर्भात नागरिकांनी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा : सहायक आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, सोलापूर मोबाईल क्रमांक : ९५५२९२६११३ तसेच बंदच्या कालावधीत सोलापूर जिल्ह्यात तालुकानिहाय पूर्णवेळ सुरू ठेवण्यात येणाऱ्या औषध दुकानांची यादी व संपर्क क्रमांक स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती सहायक आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, सोलापूर अ.स. गोडसे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# अक्कलकोट प्रयोगशाळेच्या तपासणीत ८३० पाणी नमुने दूषित

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, सोलापूर अंतर्गत अक्कलकोट येथील उपविभागीय प्रयोगशाळेने गेल्या सात वर्षांत पाणी तपासणी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. ऑगस्ट २०१८ पासून कार्यरत असलेल्या या प्रयोगशाळेत आतापर्यंत तब्बल ९ हजार ९७५ पाणी नमुन्यांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ८३० नमुने दूषित असल्याचा धक्कादायक अहवाल समोर आला आहे.

जिल्ह्यात यापूर्वी करमाळा, बार्शी, अकलूज, पंढरपूर, सोलापूर आणि सांगोला येथेच प्रयोगशाळा कार्यरत होत्या. वाढत्या गरजांचा विचार करून शासनाने कुडुर्वाडी आणि अक्कलकोट येथे नव्याने प्रयोगशाळा सुरू केली होती. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील पाणी गुणवत्तेच्या तपासणीला अधिक गती मिळाली आहे.

शासनाकडून दरवर्षी किमान २५०० पाणी नमुने तपासणीचे उद्दिष्ट दिले जाते. मात्र स्थानिक गरज आणि परिस्थिती लक्षात घेऊन प्रयोगशाळेकडून उद्दिष्टापेक्षा अधिक नमुन्यांची तपासणी केली जात असल्याने कामाचा विस्तार वाढला आहे.

प्रयोगशाळेत जैविक आणि रासायनिक अशा दोन्ही प्रकारच्या पाणी नमुन्यांची तपासणी केली जाते. मान्सूनपूर्व आणि मान्सूननंतर अशा दोन टप्प्यांत ही प्रक्रिया राबवली जाते. विशेष म्हणजे, जलजीवन मिशन अंतर्गत नव्याने पूर्ण होणाऱ्या पाणीपुरवठा योजनांसाठी पाणी नमुना तपासणी अहवाल अनिवार्य करण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना सुरक्षित आणि शुद्ध पाणी मिळावे यासाठी पाण्याच्या गुणवत्तेवर सातत्याने लक्ष ठेवण्याची आवश्यकता असल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. दूषित पाणी नमुन्यांची संख्या चिंतेचा विषय ठरत असून, यासाठी अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी माळशिरस येथील मराठा बांधव जाणार



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षण,कुणबी दाखले व इतर मराठा समाजाच्या मागण्यांसाठी समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या ३० मे पासून सुरू होणाऱ्या प्राणांतिक उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी माळशिरस तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर मराठा बांधव जाणार असून त्याच्या नियोजनासाठी दि.२३ मे रोजी सर्व पक्षीय मराठा बांधवांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवारी येथे अखंड मराठा समाज माळशिरस तालुक्यातील कार्यकर्त्यांची बैठक झाली.त्यामध्ये समाजाच्या मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी अनेक वेळा आमरण उपोषण केले,त्यामुळे त्यांच्या प्रकृतीला धोका निर्माण झाला आहे.

त्यानंतर दोन वेळा राज्यातील संपूर्ण मराठा समाज घेऊन मुंबईला गेले.मात्र आश्वासना पलीकडे हाती काही लागले नाही, अनेकदा मुदती देऊनही शासनाने केवळ फसवणूकच केल्याची मराठा समाजाची भावना झाली असल्याने शेवटी आर नाही तर पार ही भूमिका घेऊन मनोज जरांगे पाटील यांनी दि ३० मे रोजी त्यांच्या अंतरवाली सराटी या गावी पुन्हा आमरण उपोषणाचा इशारा दिला असून राज्यातील संपूर्ण मराठा समाज त्यांच्या पाठीशी आहे.

त्यांच्या या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी माळशिरस तालुक्यातून ही हजारो मराठा बांधव जाणार असल्याने त्याचे नियोजन करण्यासाठी दि.२३ मे रोजी सायंकाळी ५ वाजता कृष्ण लीला बॅंकवेट हॉल डॉ.धनेश गांधी हॉस्पिटल शेजारी याठिकाणी

या सर्व पक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे,त्यामध्ये सर्व सत्ताधारी,विरोधी पक्षाचे नेते मंडळी ही उपस्थित राहणार असल्याचे सांगून जास्तीत जास्त मराठा बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# आमदारांनी विकासकामांचा हिशोब द्यावा - वनिता गुळवे

**कन्हेरगांव (कटूसत्य वृत्त):-** डिकसळ ते कोंढारचिंचोली दरम्यान उभारण्यात येणाऱ्या नवीन पुलाच्या कामाचे श्रेय माजी आमदार संजयमामा शिंदे यांनाच जाते, असा दावा करत विद्यमान आमदारांनी गेल्या दोन वर्षांत तालुक्यात मंजूर केलेल्या विकासकामांचा लेखाजोखा जनतेसमोर मांडावा, अशी मागणी जिल्हा परिषद सदस्या वनिता सुभाष गुळवे यांनी केली आहे.



गुळवे यांनी नुकतीच डिकसळ-कोंढार चिंचोली पुलाच्या कामाची स्थळ पाहणी

बारामती ॲग्रोचे उपाध्यक्ष तसेच जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुभाष केली. यावेळी त्यांनी या पुलासाठी माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून निधी मंजूर करून घेतल्याचा दावा केला.

या पार्श्वभूमीवर पाटील गटाकडून करण्यात आलेल्या श्रेयवादाच्या वक्तव्यांना उत्तर देताना वनिता गुळवे यांनी विद्यमान आमदारांवर टीका केली. त्या म्हणाल्या की, ‘या पुलासाठी तब्बल ५५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र त्यानंतरच्या काही राजकीय घडामोडींमुळे हे काम रखडले. कॉन्ट्रॅक्टरवर दबाव टाकून काम प्रलंबित ठेवण्याचे प्रकार जनतेपासून लपून राहिलेले नाहीत.’

राजकीय श्रेयवादाच्या वादात विकासकामांवर परिणाम होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त करत परिसरातील नागरिकांनी हा महत्त्वाचा पूल लवकरात लवकर पूर्ण व्हावा, अशी मागणी केली आहे. पुलाचे काम पूर्ण झाल्यास परिसरातील वाहतूक आणि नागरिकांची मोठी गैरसोय दूर होणार असल्याचेही सांगितले जात आहे.

# वैराग नगरपंचायतीचा ५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा



**वैराग (कटूसत्य वृत्त):-** वैराग नगरपंचायतीच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार सोहळा सोमवार दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता शहाजीराव पाटील सांस्कृतिक भवन येथे उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात प्रशासकीय सेवेत निवड झालेले विद्यार्थी, आदर्श माता, नगरपंचायत कर्मचाऱ्यांची शैक्षणिक क्षेत्रात यश संपादन केलेली मुले, आरोग्य सेविका, आशा गट प्रवर्तक, आशा स्वयंसेविका तसेच नगरपंचायतीतील महिला सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. याचबरोबर सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील १०१ दिव्यांग बांधवांना निधी वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. निरंजन भूमकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती रेखाताई भूमकर, माजी जिल्हा परिषद सदस्य, श्री. अशोक वरदाने, माजी ग्रामपंचायत सदस्य तसेच श्री. आयुब पठाण, सेवानिवृत्त दुकाने निरीक्षक उपस्थित होते.

प्रशासकीय सेवेत निवड झालेल्या नामदेव धोकटे (पोलीस उपनिरीक्षक), प्राची गोवर्धन (कृषी अधिकारी), अजित चुंगे, महेश सुतार, अमित खेंदाड, विक्रम स्वामी, बाळासाहेब खेंदाड, धीरज स्वामी तसेच डॉ. सुरभी कासार यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

तसेच विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजविणाऱ्या आदर्श मातांचा गौरव करण्यात आला. नगरपंचायत कर्मचाऱ्यांच्या दहावी-बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.

आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आरोग्य सेविका, आशा गट प्रवर्तक व आशा स्वयंसेविकांचा सन्मान करण्यात आला. नगरपंचायतीतील महिला सफाई कर्मचाऱ्यांना साडी वाटप करून त्यांचा गौरव करण्यात आला.

सत्कारमूर्तींना फेटा, शाल, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला नगराध्यक्षा सुजाता डोळसे, महिला व बालकल्याण सभापती जयश्री घोडके, पाणीपुरवठा व जलनिस्सारण सभापती अजयकुमार काळोखे, आरोग्य व दिवाबत्ती सभापती अक्षय ताटे, नगरसेवक नागनाथ वाघ, आनंद घोटकर तसेच नगरसेविका, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तीन महिन्यांपासून मंद्रुप मंडळ कृषी कार्यालयाला कुलूप

## शेतकरी योजनांपासून वंचित



**दक्षिण सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मंद्रुप येथील मंडळ कृषी कार्यालय तब्बल तीन महिन्यांपासून बंद असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांपासून वंचित राहण्याची वेळ आली आहे. अर्ज सादर करणे, अनुदान प्रक्रियेची पूर्तता करणे तसेच विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या मारत आहेत; मात्र कार्यालयाला कुलूप असल्याने संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

सीना-भीमा खोऱ्यातील शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेले हे मंडळ कृषी कार्यालय सध्या अक्षरशः ओस पडल्याचे चित्र आहे. शासनाकडून कोट्यवधी रुपयांच्या कृषी योजना राबवल्या जात असताना, प्रत्यक्षात त्यांची माहिती देणारे आणि अंमलबजावणी करणारे कार्यालयच बंद असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

स्थानिक शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, मंडळ कृषी अधिकारी किरण सावंत यांच्या नियुक्तीनंतर कार्यालय नियमित सुरू राहत नसल्याच्या तक्रारी वारंवार होत आहेत. अनेक वेळा शेतकरी कार्यालयात येऊनही निराश होऊन परतत आहेत. ‘आज या, उद्या या’ अशा उडवाउडवीच्या उत्तरांमुळे शेतकऱ्यांची थट्टा केली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे मार्च अखेरीस विविध योजनांच्या अर्ज प्रक्रिया आणि अनुदान कामांची लगबग सुरू असताना कार्यालय बंद असल्याने अनेक गावांतील शेतकरी अडचणीत आले आहेत. एकीकडे पिकांचे नुकसान, विजेच्या समस्या आणि आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या या उदासीनतेमुळे आणखी फटका बसत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा-संतप्त शेतकऱ्यांनी मंद्रुप मंडळ कृषी कार्यालय तात्काळ नियमित सुरू करावे, जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करावी आणि रखडलेली कामे त्वरित मार्गी लावावीत, अशी मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

‘अतिरिक्त पदभार’ कारणावर प्रश्नचिन्ह- या संदर्भात विचारणा केली असता संबंधित अधिकाऱ्यांकडून ‘अतिरिक्त पदभार’ हे कारण पुढे केले जात आहे. मात्र अतिरिक्त पदभाराच्या नावाखाली शेतकऱ्यांची कामे रखडविणे कितपत योग्य आहे, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

# महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक २०२६ जाहीर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मा. भारत निवडणूक आयोगाने त्यांचे पत्र दि. १८ मे २०२६ अन्वये महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक २०२६ चा कार्यक्रम जाहीर केला असून, आज सोमवार दि. १८ मे २०२६ पासून जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

निवडणूक कार्यक्रमानुसार अधिसूचनेची प्रसिद्धी सोमवार दि. २५ मे २०२६ रोजी होणार आहे.

नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची अंतिम तारीख सोमवार दि. १ जून २०२६ आहे.

नामनिर्देशन पत्रांची छाननी मंगळवार दि. २ जून २०२६ रोजी करण्यात येणार आहे.

उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची अंतिम तारीख गुरुवार दि. ४ जून २०२६ निश्चित करण्यात आली आहे.

मतदान गुरुवार दि. १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत होणार आहे.

मतमोजणी सोमवार दि. २२ जून २०२६ रोजी करण्यात येईल.

निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख गुरुवार दि. २५ जून २०२६ आहे.

जिल्ह्यातील सर्व संबंधितांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केले आहे.

# न्यासाच्या उल्लेखनीय कार्यामुळे भक्तांना सोयी सुविधा एकाच छताखाली मिळत आहे- कृष्णराज महाडिक



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून होत असलेल्या उल्लेखनीय कायार्मुळे भक्तांना विविध सोयी सुविधा एकाच छताखाली मिळत असल्याचे मनोगत भिमा सहकारी साखर कारखान्याचे (सिकंदर टाकळी, ता. मोहोळ) मार्गदर्शक संचालक व भाजपा युवा मोचार्चे प्रदेश अध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या समवेत भाजपचे पदाधिकारी प्रदीप पाटील, महेश बिराजदार, सिद्धार्थ पाटील, अमोल महाडिक आदिजन उपस्थित होते.

याप्रसंगी मनोज निकम, सौरभ मोरे, वैभव मोरे, प्रवीण देशमुख, शुभम सावंत, किरण साठे, विनायक भोसले, विशाल कलबुर्गी, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, महांतेश स्वामी, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# शिंगणापूर पाटी ते पिंपरी कमाण रस्त्यावरील त्रुटी संदर्भात कार्यकारी अभियंता यांना निवेदन



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** शिंगणापूर पाटी ते पिंपरी कमाण व त्यालगतच्या परिसरातील रस्त्याचे काम करत असताना कंत्राटदार जगताप यांनी अत्यंत निष्काळजीपणा करून कामात मोठ्या चुका केल्या संदर्भात सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष अक्षय भांड यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग अकलूज येथील कार्यकारी अभियंता सुनिता पाटील यांची भेट घेऊन तेथील रस्त्याच्या संदर्भात येणाऱ्या अडचणी विषयी योग्य ती कारवाई होण्याबाबत सविस्तर चर्चा करून निवेदन दिले.

सदर देण्यात आलेल्या निवेदनामध्ये असे म्हणण्यात आले आहे की, शिंगणापूर पाटी ते पिंपरी कमाण व त्यालगतच्या परिसरातील अत्यंत गंभीर आणि संवेदनशील या रस्त्यावरून वाहनांची वाहतूक अत्यंत बेदरकार आणि अतिवेगाने सुरू आहे. गाड्यांच्या वेगावर कोणतेही नियंत्रण राहिले नसल्याने हा रस्ता सध्या अपघातांचे केंद्र बनला आहे.या रस्त्याचे काम करत असताना कंत्राटदार जगताप यांनी अत्यंत निष्काळजीपणा केला असून कामात मोठ्या चुका केल्या आहेत. रस्त्याचे चुकीचे डिझाईन आणि नियोजनाचा अभाव यामुळे स्थानिक जनतेला आणि वाहनधारकांना नाहक मनस्ताप व जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, संबंधित कंत्राटदाराने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आणि स्थानिक प्रशासनाच्या नियमावलीचे उल्लंघन करून, कोणतीही अधिकृत परवानगी न घेता अनेक ठिकाणी चुकीचे व अनधिकृत स्पीडब्रेकर (गतिरोधक) बनवले आहेत; तर ज्या ठिकाणी अपघात प्रवण क्षेत्र असल्याने गतीरोधकाची खरी गरज आहे, तिथे मात्र कोणतीही उपाययोजना केलेली नाही.या प्रशासकीय ढिसाळपणामुळे आणि कंत्राटदाराच्या मनमानी कारभारामुळे या भागात माझ्या धनगर बांधवांच्या अनेक मेंढ्या गाड्यांच्या धडकेत मृत्युमुखी पडल्या आहेत. मेंढपाळ बांधवांचे हे अतोनात आर्थिक नुकसान आणि मानसिक छळ केवळ सार्वजनिक बांधकाम विभाग व कंत्राटदार यांच्या निष्काळजी पणामुळे होत असल्याने संबंधित रस्त्याची पाहणी करून तेथील उपाय योजना करून कामात निष्काळजीपणा करणारे कंत्राटदार यांच्यावर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी निवेदनाद्वारे सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष अक्षय भांड यांनी केली आहे.